MHYA050000842024

दाखल तारीख – ०३/०१/२०२४
नोंदणी तारीख – ०३/०१/२०२४
निकाल तारीख – १७/०४/२०२६
कालावधी – ०२व. ०३म. १४दि.

# न्यायनिर्णय

(दिनांक १७/०४/२०२६ रोजी जाहिर केला)

प्रस्तुतचा खटला आरोपीविरूध्द महाराष्ट्र दारूबंदी कायदा कलम ६५ ई, फ अन्वये चालविण्यात आला आहे.

२. अभियोग पक्षाचा आणि आरोपीचे वकिलांचा युक्तीवाद ऐकला. अभियोग पक्षाचा युक्तीवाद व अभिलेखावरील पुरावे यावरून खालील मुद्दे माझे निदर्शनास आले असुन त्यावरील निष्कर्ष मी खालीलप्रमाणे कारणांसह नोंदवित आहे.

| | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | दिनांक २२/११/२०२३ रोजी मौजे ईसापुर, ता. पुसद, जि. यवतमाळ येथे आरोपी तिचे राहते घरी ३ ड्रममध्ये ३०० लीटर मोहमाच सडवा व ३० लीटर गावठी हातभट्टीची दारू मुद्देमाल अवैधरीत्या बाळगतांना मिळुन आली व त्याद्वारे महाराष्ट्र दारूबंदी कायदा कलम ६५ ई, फ नुसार शिक्षापात्र गुन्हा केला हे सरकार पक्षाने सिध्द केले आहे काय ? | **नकारार्थी** |
| २. | आदेश काय ? | आरोपीस निर्दोष मुक्त करण्यात आले. |

३. आरोपीने त्याच्यावरील लावण्यात आलेले आरोप फेटाळून संपरिक्षणाची तयारी दाखवली. अभियोगपक्षातर्फे प्रस्तुत प्रकरणात सा. क्रं. १ फिर्यादी रमेश मोतीराम राठोड यांची साक्ष नोंदवण्यात आली. अभियोगपक्षातर्फे पुरावा पुर्ण नोंदवल्यानंतर आरोपीचे फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३(१)(ब) अन्वये घेण्यात आलेले निवेदन व खटल्यातील बचाव लक्षात घेता त्याने त्याच्या विरुध्द खोटी केस दाखल केली आहे असा बचाव घेतला आहे. आरोपीने स्वतास अथवा इतर कुठलाही साक्षीदार बचावकामी तपासलेला नाही.

## कारणमिमांसा

४. प्रस्तुत प्रकरणात अभियोग पक्षाने छापील प्रथम खबर अहवाल निशाणी क्रं. पी३, घटनास्थळ पंचनामा नि.क्र. पी१, जप्ती पंचनामा निशाणी क्रं. पी२ व रासायनिक प्रयोगशाळेचा अहवाल निशाणी क्रं. १२ वर आपली भिस्त ठेवली आहे. आरोपीने बचाव कामी कुठलाही साक्षीदार अथवा स्वतास तपासले नाही.

## मुददे क्रं.०१ साठी

५. सा.क्र.०१ फिर्यादी रमेश राठोड यांनी त्यांच्या साक्षीत असे सांगितले आहे की, दिनांक २२/११/२०२४ रोजी ते सहा. दुय्यम निरीक्षक म्हणुन राज्य उत्पादन शुल्क कार्यालय पुसद येथे कर्तव्यावर असतांना त्यांना गुप्त बातमीदारामार्फत माहिती मिळाली की, आरोपी तिचे राहते घरी ईसापुर येथे दारूची चोरटी विक्री करीत

आहे. सदर माहिती मिळाल्यानंतर निरीक्षक खरात, जवान राठोड व ते असे ईसापुर येथे दोन पंचासमक्ष आरोपीच्या घराजवळ गेले. त्यांना आरोपीच्या घरात ३०० लीटर मोहाफुल सडवा रसायन आणि ३० लीटर हातभट्टीची दारू आढळुन आली. सदर दारू जप्त करून त्याचा घटनास्थळ व जप्ती पंचनामा निरीक्षक खरात यांनी तयार केला. घटनास्थळ पंचनामा नि.क्र. पी१ व जप्ती पंचनामा नि.क्र. पी२ वरील त्यांनी निरीक्षक खरात, दोन पंच व आरोपीची सही मान्य केली असुन त्यातील मजकुर खरा व बरोबर असल्याचे कथन केले आहे. त्यानंतर त्यांनी राज्य उत्पादन शुल्क कार्यालय पुसद येथे येऊन आरोपीविरूध्द तक्रार दिली. छापील प्रथम खबर अहवाल नि.क्र. पी३ वरील त्यांची सही व त्यातील मजकुर त्यांनी मान्य केला आहे.

**६.** आरोपीच्या वकिलांनी घेतलेल्या उलटतपासा दरम्यान साक्षीदाराने असे कथन केले की, छापा मारण्यापूर्वी त्याबाबतची नोंद पोलीस स्टेशन डायरीला केली होती. तसेच साक्षीदारांना पंच म्हणुन उपस्थित राहण्यासाठी लेखी नोटीस दिली होती. या व्यतिरीक्त त्यांना विचारण्यात आलेल्या सर्व सुचनांना त्यांनी नकारार्थी उत्तर दिले.

**७.** अभियोग पक्षातर्फे नोंदवण्यात आलेल्या पुराव्याचे अवलोकन केले असता असे निदर्शनास येते की, प्रस्तुत प्रकरणात महत्वाचे साक्षीदार असलेले सा.क्रं. ०१ फिर्यादी यांनी फिर्याद निशाणी क्रं. पी३, घटनास्थळ पंचनामा नि.क्र. पी१ व जप्ती पंचनामा निशाणी क्रं. पी२ सिध्द केला आहे. प्रस्तुत साक्षीदाराच्या पुराव्याचे अवलोकन केले असता त्यांच्या कथनानुसार आरोपीच्या ताब्यातून ३०० लीटर मोहाफुल सडवा

रसायन आणि ३० लीटर हातभट्टीची दारू जप्त करण्यात आली होती.

८. प्रस्तुत प्रकरणातील जप्त मुददेमाल ही दारु होती याबाबत पुरावा पाहणे गरजेचे आहे. प्रस्तुत प्रकरणातील जप्त मुद्देमाल हा रासायनिक प्रयोगशाळा येथे पाठविल्या बाबतचे कथन साक्षीदार क्रं. ०१ यांनी केले आहे व तसेच रासायनीक प्रयोगशाळेचा अहवाल अभिलेखावर दिसुन येतो. सदर अहवालानुसार गु. क्रं. २३३/२०२३ मधील सॅंपल क्रं. १ मध्ये ५.२७ टक्के व सॅंपल क्र. २ मध्ये ९.३३ टक्के ईथाईल अल्कोहोलचे प्रमाण असल्याचे नमुद आहे. त्यामुळे जप्त करण्यात आलेल्या मुददेमालामध्ये ईथाईल अल्कोहोल होते हे दिसुन येते. परंतु प्रस्तुत प्रकरणातील महत्वाचे साक्षीदार असलेले सा. क्रं. ०१ यांनी त्यांच्या पुराव्यामध्ये सदरचा मुददेमाल हा कोणामार्फत रासायनीक प्रयोगशाळा येथे पाठविण्यात आला होता याबाबत कुठलेही कथन केलेले नाही. तसेच अभिलेखावर जप्त मुददेमाल रासायनीक प्रयोगशाळा येथे नेण्याबाबत कुठल्याही अधिका–याचे तपासटीपण दिसुन येत नाही. त्यामुळे प्रस्तुत गुन्हयातील जप्त करण्यात आलेला मुददेमाल हा रासायनीक प्रयोगशाळा येथे पाठविण्यात आला याबाबत स्पष्ट असा पुरावा अभिलेखावर उपलब्ध नाही. म्हणुन जप्त मुददेमाल हा रासायनीक प्रयोगशाळा येथे पाठविल्याबाबत संशय निर्माण होतो.

९. वरील सर्व विवेचनावरुन असे निदर्शनास येते की, आरोपीच्या ताब्यातून बेकायदेशीरपणे ३०० लीटर मोहाफुल सडवा रसायन आणि ३० लीटर हातभट्टीची दारू जप्त करण्यात आली होती ही बाब अभियोगपक्ष निःसंशयितरित्या सिध्द करु शकले

नाही. अभिलेखावरील पुरावा हा आरोपीविरुध्द गुन्हा सिध्द करण्यास अपुरा ठरतो. त्यामुळे मी मुददा क्रं १ चे उत्तर **नकारार्थी** नोंदवत आहे.

## मुददे क्रं. ०२ साठी

**१०.** मुददे क्रं. ०१ वरील निष्कर्षावरुन अभियोग पक्षाने आरोपीविरुध्दची केस ही सबळ पुराव्यासहीत निसंशयीत रित्या सिध्द केलेली नाही. अभिलेखावरील पुरावा हा आरोपीस दोषी ठरविण्याकरीता अपुरा ठरतो. त्यामुळे आरोपीची निर्दोष मुक्तता करणे न्यायोचित होईल. प्रस्तुत प्रकरणात पोलिसांनी ३० लीटर गावठी हातभट्टीची दारू जप्त केली आहे. सदरची दारू अपिल कालाधीनंतर राज्य उत्पादन शुल्क पुसद यांचेकडे योग्य त्या कारवाईस्तव पाठवून देणे न्यायोचीत होईल. प्रस्तुत प्रकरणातील आरोपी हा संपरिक्षेदरमयान नियमितपणे उपस्थित असल्याने फौजदारी प्रक्रीया संहिता कलम ४३७–अ अन्वये त्याचे व्यक्तितीक बंधपत्र घेणे न्यायोचित होईल. सबब मुददे क्रं. ०२ च्या उत्तरार्थ मी खालील आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. आरोपी पद्मा किशोर शेंडे यांना फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २५५(१) अन्वये महाराष्ट्र दारूबंदी कायदा कलम ६५ ई, फ नुसारचे गुन्ह्यामधुन निर्दोष मुक्त करण्यात येत आहे.

२. आरोपीचे बंदपत्र व जामीनपत्र रद्द करण्यात येत आहे.

३. आरोपी यांनी फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४३७–अ प्रमाणे जमानतीची पूर्तता करावी.

४. जप्त मुद्देमाल दारू अपिल कालाधीनंतर राज्य उत्पादन शुल्क पुसद यांचेकडे योग्य त्या कारवाईस्तव पाठवण्यात यावा.

Digitally signed by CHONDE GAJANAN GOVINDRAO
Date: 2026.04.17 16:46:22 +0530

दिनांक – १७/०४/२०२६

**(जी. जी. चोंडे)**
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, पुसद